| Meeting No. |
| --- |
| सभा नं. |

# प्रोसिडींग बुक



Date of Meeting : / /20 Time :

सभेची तारीख : ३० / १२ / २०२३ वेळ : ११.००.



दिनांक १०।१२।२०२३, रविवार रोजी सकाळी ११:०० वा. कल्याणी चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष डॉ. रविंद्र गं. सपकाळ यांच्या अध्यक्षतेखाली 'महाविद्यालय विकास समितीची' बैठक पार पडली. सभेत खालील सदस्य उपस्थित होते.

| अनु क्र. | नांव | पदनाम | स्वाक्षरी. |
| --- | --- | --- | --- |
| ०१) | डॉ. रविंद्र गंभीरराव सपकाळ<br>अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक,<br>कल्याणी चॅरिटेबल ट्रस्ट. | अध्यक्ष. | [signature] |
| ०२) | श्री. जितेंद्र भीमराव सोनवणे,<br>सचिव,<br>कल्याणी चॅरिटेबल ट्रस्ट | सचिव. | [signature] |
| ०३) | प्रा. डॉ. निलेश रामराव नानखडे<br>विभागप्रमुख, कॉम्प्युटर इंजि. | विभाग प्रमुख. | [signature] |
| ०४) | प्रा. डॉ. तुषार यशवंत बडगुजर<br>विभाग प्रमुख, मॅकेनिकल इंजि. | शिक्षक प्रतिनिधी | [signature] |
| ०५) | प्रा. संदिप गुलाबराव वाघुल.<br>एफ.ई. कॉ-ऑर्डीनेटर | शिक्षक प्रतिनिधी | [signature] |
| ०६) | श्रीम. पुनम सुधाकर तलमले<br>सहा. प्राध्यापिका, मॅकॅनिकल इंजि. | शिक्षक प्रतिनिधी-<br>(महिला) | [signature] |
| ०७) | श्री. नितीन गुलाबराव नावरे,<br>लिपिक,<br>एल जी एन एस सी ओ ई. | शिक्षकेतर प्रतिनिधी | [signature] |
| ०८) | डॉ. सुहास बाळासाहेब धांडे,<br>संचालक, के आर सपकाळ कॉलेज ऑफ मॅनेजमेंट ॲण्ड स्टडीज | सदस्य<br>(शैक्षणिक क्षेत्र) | [signature] |
| ०९) | श्री. आनंद शिरसाठ<br>नाशिक. | सदस्य<br>(तंत्रज्ञान क्षेत्र) | [signature] |
| १०) | डॉ. माणिक धानोरकर<br>नाशिक | सदस्य<br>(संशोधन क्षेत्र) | [signature] |
| ११) | श्री. पुरुषोत्तम मधुकर कडलग<br>ता. त्र्यंबकेश्वर, नाशिक | सदस्य<br>(सामाजिक क्षेत्र) | [signature] |
| १२) | प्रा. डॉ. विक्रम अशोक कोल्हे.<br>प्राध्यापक, मॅकेनिकल इंजि. | समन्वयक,<br>अंतर्गत गुणवत्ता सिद्धता कक्ष. | [signature] |
| १३) | कु. रिया राधेश्याम चौहाण | सदस्या<br>(विद्यार्थिनी) | [signature] |

| अनु. क्र. | नाव | पदनाम | स्वाक्षरी. |
|---|---|---|---|
| ४४) | कु. जयेश बाळू शेवाळे | सदस्य (विद्यार्थी) | Jayesh |
| ४५) | प्रा. डॉ. साहेबराव भाऊराव बागल. प्राचार्य, एल जी एन एस सी.ओ.ई. | सदस्य सचिव. | [illegible] |

दिनांक १०।१२।2023 रोजी खालीलप्रमाणे विषयांवर चर्चा झाली व निर्णय घेण्यात आले.

विषय क्र.१) मागील सभा दि. ०६।०४।2023 चे इतिवृत्त वाचून मंजूर करणे.

ठराव क्र.१) मागील सभा दि. ०६।०४।2023 चे संपूर्ण इतिवृत्त सभेसमोर वाचून दाखवले. सर्व उपस्थित सदस्यांनी सदर इतिवृत्त एकमताने मंजूर केले.

सूचक :- प्रो. जितेंद्र भि. सोनवणे
अनुमोदक :- डॉ. रविंद्र ग. सपकाळ.

विषय क्र.२) विद्यार्थ्यांना पुरवल्या जाणाऱ्या विविध शैक्षणिक सुविधांचा आढावा घेणे

ठराव क्र.२) महाविद्यालयामध्ये एफ.ई. ते बी.ई. (पदवी) व एम.ई. (पदव्युत्तर) या अभ्यासक्रमात प्रवेशित विद्यार्थ्यांना पुरविण्यात येणाऱ्या विविध सुविधांचा आढावा घेण्यात आला. प्रत्येक विभागात शिक्षकांनी शिकवलेला अभ्यासक्रम, त्याची गती, विद्यार्थ्यांना होणारे विषयाचे आकलन याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी प्रत्येक विद्यार्थ्या कडे वैयक्तिक लक्ष देऊन त्याला आवश्यक असलेली योग्य मदत करण्याचे डॉ. सुहास घांडे यांनी सुचवले. शैक्षणिक प्रगतीत कुठलाही विद्यार्थी मागे न राहता अशा प्रकारची उपाययोजना करण्याचे यावेळी ठरविण्यात आले. तसेच प्रत्येक विभागप्रमुखांना त्यांच्या विभागातील विद्यार्थ्यांची उपस्थिती बाबत कडक धोरण राबविण्याबाबत सूचित करण्यात आले. विद्यार्थ्यांकडून चांगला अभ्यास करवून घेऊन परिक्षेला सामोरे जाताना त्यांनी कुठलाही गैरप्रकार करु नये यासाठी त्यांचे समुपदेशन करण्याचे यावेळी सांगितले गेले. त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या वाहतूक व वसतीगृह या सुविधांचा आढावा घेण्यात आला. त्यामध्ये कुठल्याही विद्यार्थ्यांची तक्रार असल्यास त्या तक्रारीतील तथ्य तपासून त्याचे तातडीने निराकरण करण्याबाबत संबंधितांना यावेळी सूचित करण्यात आले. वसतीगृहातील विद्यार्थ्यांना रात्रीच्या वेळी अभ्यास करण्यासाठी कॉम्प्युटर विभागातील ०२ वर्ग खोल्या देण्यात याव्या याबाबत संबंधितांना सूचित करण्यात आले.

विद्यार्थ्यांची प्रशासकीय कार्यालयातील कामे जसे कि, परिक्षा फॉर्म / स्कॉलरशिप फॉर्म भरणे, विविध प्रकारची प्रमाणपत्रे प्राप्त करणे इत्यादी अधिक जलदगतीने आणि सहज करावीत असे निर्देश शिक्षकेतर सदस्य श्री. नितीन जावरे यांना सभेकडून देण्यात आले. तसेच विद्यार्थ्यांना आवश्यक ट्रेनिंग एंड प्लेसमेंट, वैद्यकीय, क्रीडा, मनोरंजन, शारिरिक व्यायाम इत्यादी संदर्भात देण्यात येणाऱ्या सुविधांचा आढावा घेऊन त्यामध्ये आवश्यक तेथे सुधारणा करण्याबाबत सभेकडून सूचित करण्यात आले.

सूचक - डॉ. सुहास बा. घांडे
अनुमोदक - श्री नितीन गु. जावरे

विषय क्र.३) महाविद्यालय इमारतींमधील विविध बाबींच्या/वस्तूंच्या दुरुस्तीबाबत

ठराव क्र.३) लेट जी एन सपकाळ कॉलेज ऑफ इंजिनिअरींग या आमच्या संस्थेच्या महाविद्यालयाच्या एकूण ०४ इमारतींमधील विविध वस्तूंची / बाबींची दुरुस्ती आवश्यक असल्याची बाब समितीच्या निदर्शनास आल्याने त्यांची तातडीने डागडुजी व दुरुस्ती करण्याबाबत चर्चा करण्यात आली. यामध्ये प्रत्येक वर्ग खोलीला कडी / कोयंडा / लॅच लॉक असणे आवश्यक असल्याने ज्या खोलीला तशी व्यवस्था नाही अथवा खराब झाली आहे त्याठिकाणी कडी / लॅच लॉक बसवण्याबाबत सूचित करण्यात आले.

Meeting No.
सभा नं.

# प्रोसिडींग बुक



प्रयोग शाळा, वर्ग खोल्या, कार्यालये येथील तुटलेल्या खुर्च्यांचे व्हील्स हायड्रोलिक बसवणे, नादुरुस्त वाईरस, पंखे इत्यादींची कामे करण्याचे यावेळी ठरविण्यात आले. क्रीडांगणाची देखभाल करुन रात्रीच्या वेळी तेथे प्रकाश व्यवस्था करण्याबाबत श्री. हर्षल येवला यांना सूचना करण्यात आले. प्रसाधन गृहातील नादुरुस्त नळ, दरवाजे, कडया आदींची देखभाल दुरुस्ती करण्याबाबत संबंधितांना सूचना करण्यात आले. रस्त्यांच्या दुतर्फा असलेली झाडे, बाग इत्यादींची आवश्यक छाटणी / देखभाल करण्याबाबत संबंधितांना सांगण्याचे ठरविण्यात आले.

सूचक - प्रा. डॉ. एस. बी. बागल
अनुमोदक - प्रा. संदीप जी. बागुल.

Prof.(Dr.) Sahebrao B. Bagal
Principal
Late G. N. Sapkal College of Engineering
Anjaneri, Nashik-422 213.

Kalyani Charitable Trust, Mumbai
Late G. N. Sapkal College of Engineering, Anjaneri, Nashik 422 212 * KCT *

President
Kalyani Charitable Trust,

Date of Meeting : / /20 Time :
सभेची तारीख : ०७ / ०४ / २०२४ वेळ : ११.०० वा.



दिनांक ०७/०४/२०२४, रविवार रोजी सकाळी ११.०० वा. कल्याणी चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष डॉ. रविंद्र गंभीरराव सपकाळ यांच्या अध्यक्षतेखाली महाविद्यालय विकास समितीची बैठक पार पडली. सभेत खालील सदस्य उपस्थित होते.

| अनु क्र. | नाव | पदनाम | स्वाक्षरी |
|---|---|---|---|
| ०१) | डॉ. रविंद्र गंभीरराव सपकाळ<br>अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक,<br>कल्याणी चॅरिटेबल ट्रस्ट. | अध्यक्ष | [signature] |
| ०२) | श्री. जितेंद्र भिमराव सोनवणे<br>सचिव,<br>कल्याणी चॅरिटेबल ट्रस्ट. | सचिव | [signature] |
| ०३) | प्रा. डॉ. निलेश रामराव वानखडे<br>विभाग प्रमुख, कॉम्प्युटर इंजि. | विभाग प्रमुख | [signature] |
| ०४) | प्रा. डॉ. तुषार यशवंत बडगुजर<br>विभाग प्रमुख, मॅकेनिकल इंजि. | शिक्षक प्रतिनिधी | [signature] |
| ०५) | प्रा. संदीप गुलाबराव बागुल<br>एफ. ई. कॉऑर्डीनेटर | शिक्षक प्रतिनिधी | [signature] |
| ०६) | श्रीम. पूनम सुधाकर तसमले<br>सहा. प्राध्यापिका, मॅकेनिकल इंजि. | शिक्षक प्रतिनिधी (महिला) | [signature] |

Meeting No.
सभा नं.

# प्रोसिडींग बुक



Date of Meeting : / /20 Time :
सभेची तारीख : / / २० वेळ :



| अनु क्र. | नाव | पदनाम | स्वाक्षरी |
| --- | --- | --- | --- |
| ०७) | श्री. तुषार प्रभाकर डोके, कार्यालय अधिक्षक, एल जी एन एस सी ओ ई | शिक्षकेतर प्रतिनिधी. | [signature] |
| ०८) | प्रा. डॉ. सुहास बाळासाहेब धांडे संचालक, के आर सपकाळ कॉलेज ऑफ मॅनेजमेंट अँड स्टडीज. | सदस्य (शैक्षणिक क्षेत्र) | [signature] |
| ०९) | श्री. आनंद शिरसाठ नाशिक | सदस्य (तंत्रज्ञान क्षेत्र) | [signature] |
| १०) | डॉ. माणिक घानोरकर, नाशिक. | सदस्य (संशोधन क्षेत्र) | [signature] |
| ११) | श्री. पुरुषोत्तम मधुकर कडलग त्र्यंबकेश्वर, जि- नाशिक | सदस्य (सामाजिक क्षेत्र) | [signature] |
| १२) | प्रा. डॉ. विक्रम अशोक कोल्हे, प्राध्यापक, मेकॅनिकल इंजि. | समन्वयक, अंतर्गत गुणवत्ता सिध्दता कक्ष. | [signature] |
| १३) | कु. रिया राधेश्याम चौहाण तृतीय वर्ष कॉम्प्युटर इंजि. | विद्यार्थी सदस्य | [signature] |

| अनु क्र. | नाव | पदनाम | स्वाक्षरी |
| --- | --- | --- | --- |
| १४) | कु. जयेश बाळू शेवाळे. तृतीय वर्ष सिविल इंजि. | विद्यार्थी सदस्य | [signature] |
| १५) | प्रा. डॉ. साहेबराव भाऊराव बागल, प्राचार्य, एल जी एन एस सी ओ ई | सदस्य सचिव. | [signature] |

विषय क्र. ०१) मागील सभा दि. २०/१२/२०२३ चे इतिवृत्त वाचून मंजूर करणे.

ठराव क्र. ०१) मागील सभा दि. ३०/१२/२०२३ चे संपूर्ण इतिवृत्त वाचून दाखवले व त्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

सूचक - श्री. जितेंद्र मेसोनगे
अनुमोदक - डॉ. रविंद्र गं. सपकाळ

विषय क्र. ०२) National Assessment and Accreditation Council (NAAC) यांचेकडून महाविद्यालयाचे करण्यात येणाऱ्या असलेल्या मूल्यांकनाबाबत.

ठराव क्र. ०२) National Assessment and Accreditation Council (NAAC) यांचेकडून महाविद्यालयाचे करण्यात येणाऱ्या असलेल्या मूल्यांकनाच्या कामासाठी या अगोदरच महाविद्यालयाच्या अंतर्गत गुणवत्ता सिध्दता कक्षाचे समन्वयक प्रा. डॉ. विक्रम अशोक कोल्हे यांना NAAC co-ordinator म्हणून नियुक्त केल्याचे प्रा. डॉ. एस. बी. बागल यांनी सभेला सांगितले. तसेच NAAC संदर्भात आवश्यक असलेले रिपोर्टस संबंधीत प्राधिकरणाला ऑनलाईन पध्दतीने सुपूर्द करण्याचे काम प्रगती पथावर असल्याचे मा. प्राचार्य यांनी सांगितले. सन २०१८ पासून म्हणजेच NAAC Peer committee च्या पाहिल्या भेटीपासूनच महाविद्यालयाचे संपूर्ण शैक्षणिक व प्रशासकीय कामकाज

त्यांच्या विहीत दिशा निर्देशांनुसार चालू असल्याचे सभेला सांगण्यात आले. NAAC समितीच्या भेटीसाठी वेगवेगळ्या समित्या गठीत केल्या असून सर्व कर्मचारी त्यांना नेमून दिलेले काम करीत असल्याचे व झालेल्या कामाचे वेळोवेळी अवलोकन होत असल्याचे प्रा. डॉ. एस. बी. बागल यांनी सांगितले. NAAC समितीची महाविद्यालयाला होत असलेल्या भेटीची संभाव्य तारीख हि माहे जुलै किंवा ऑगस्ट २०२४ असणार असल्याची माहिती यावेळी सभेला देण्यात आली. महाविद्यालयाने मागील ०५ वर्षात शैक्षणिक आणि प्रशासकीय कामकाजात अनेक विद्यार्थीभिमुख व त्यांच्या अनुकूल असणारे बदल केल्याचे प्रा. डॉ. एस. बी. बागल यांनी सभेला सांगितले. विविध क्रायटेरिया बाबत झालेले काम व त्याचा तपशील डॉ. विक्रम अशोक कोल्हे यांनी सभेसमोर ठेवला. यावेळी सर्व सदस्यांनी NAAC समितीच्या अनुषंगाने होत असलेल्या कामाबाबत समाधान व्यक्त करून राहिलेल्या बाबी लवकरात लवकर पूर्ण करणेसाठी मार्गदर्शन केले.

सूचक - प्रा. डॉ. विक्रम अ. कोल्हे.
अनुमोदक - श्री. पुरुषोत्तम म. कलंत्री.

विषय क्र. ०३) सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांसाठी असलेल्या विविध योजना प्रभावीपणे राबविणे तसेच परिक्षेच्या दरम्यान होत असलेल्या कॉप्या - गैर प्रकाराला संपूर्ण आळा घालणेबाबत चर्चा करून निर्णय घेणे.

ठराव क्र. ०३) सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या वतीने महाविद्यालय विद्यार्थ्यांसाठी अनेक लोककारी व सर्वांगीण विकास करणाऱ्या योजना राबविल्या जात आहेत. यामध्ये विद्यापीठाच्या विद्यार्थी कल्याण मंडळातर्फे राबविली जाणारी कमवा व शिका योजना, विद्यार्थी विमा योजना, राष्ट्रीय सेवा योजना (एन एस एस), क्रीडा विभागातर्फे घेण्यात येणाऱ्या जिल्हा, राज्य आणि राष्ट्रीय पातळीवरील स्पर्धा आदी गोष्टींचा समावेश होतो. या सर्व योजना विद्यार्थी कल्याण मंडळाच्या महाविद्यालय प्रमुख / विद्यार्थी कल्याण अधिकारी प्रा. सौ. सीमा रविंद्र बाजी, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम समन्वयक प्रा. किशोर वामनराव काळे आणि महाविद्यालयाचे शारीरिक शिक्षण संचालक प्रा. डॉ. राजेश काशिनाथ कासार यांच्यामार्फत विद्यार्थ्यांपर्यंत पोहचत आहेत. या विविध योजनेत विद्यार्थ्यांची संख्या अधिकाधिक कशी वाढेल याबाबत प्रभावी उपाययोजना, योजनांना प्रसिद्धी देणे, विद्यार्थ्यांचे समुपदेशन करणे, विद्यार्थ्यांच्या अंगी असलेले सुप्त कलागुण ओळखून त्यांचे प्रकटीकरण करण्यास त्यांना प्रोत्साहन देणेविषयी सभेतील सदस्यांनी मार्गदर्शन केले. या सर्व योजना प्रत्येक पात्र आणि इच्छुक विद्यार्थ्यांपर्यंत पोहचवाव्यात अशा संबंधित प्रमुखांना देणेबाबत निर्देश देण्यात आले.

सूचक - डॉ. तुषार यशवंत वडमुजर
अनुमोदक - प्रा. संदिप गुलाबराव बागुल.

Prof.(Dr.) Sahebrao B. Bagal
Principal
Late G. N. Sapkal College of Engineering
Anjaneri, Nashik-422 213

KCT's Late G. N. Sapkal College of Engineering, Anjaneri, Nashik 422 212

Kalyani Charitable Trust, Mumbai
President
Kalyani Charitable Trust,